RNI No. MAHMAR/2008/26657
E-mail : yuvarashtradarshan.com
नागपूर, मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ ■ वर्ष १७ ■ अंक ३०७ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये

# युवाराष्ट्र दर्शन

संपादकीय

## तुझ माझ जमेना तुझ्यावाचून करमेना

महापालिका निवडणुका अंतिम टप्प्यात आल्या तरी कुठल्याही पक्षात युती किंवा आघाडी होताना दिसून येत नाही. राज्यात भाजपा, शिंदेसेना आणि अजित पवारांचा राकाँ अशी युती, तर काँग्रेस, ठाकरेसेना आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष अशी आघाडी आहे. सुरूवातील युती आणि आघाडीमधील नेते आम्ही युतीत लढू अशा घोषणा करीत होते. भाजपला रोखण्यासाठी आम्हाला आघाडी लढण्याशिवाय पर्याय नाही असे विरोधक म्हणत होते. परंतु, जागा वाटपाच्या वेळी युती आणि आघाडी यांच्यात फाटाफूट झाली. मुंबईत मनसे आणि ठाकरे सेना यांच्यात युती झाल्याने काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला. शेवटी आघाडीतून बाहेर पडत काँग्रेसने मुंबईत वंचित बहुजन आघाडीसोबत युती करून आपले उमेदवार देखील जाहीर केले. तिकडे युतीत असलेल्या पक्षांची सोलापुरात फूट पडली. भाजपविरुद्ध शिंदेसेना आणि अजित पवार यांनी कंबर कसली आहे. त्यामुळे भाजपचे उमेदवार पेचात पडले आहेत. चंद्रपूर येथे वंचित बहुजन आघाडी आणि ठाकरे सेना यांच्यात युती झाली आहे. नाशिकमध्ये अजित पवार गट आणि शिंदेसेना यांनी भाजपला सोबत न घेता युती केली आहे. सर्वच महापालिकांमध्ये हे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे कालपर्यंत आम्ही युती, आघाडीत लढू असे म्हणणारे पक्ष आज वेगळे झाल्याचे दिसत आहेत. त्याला कारणही तसेच आहे. प्रत्येक पक्षाला महापालिका ही त्यांच्या खिशात हवी आहे. त्यासाठी जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणणे आवश्यक आहे. परंतु, युती, आघाडीत असलेल्या पक्षांनी देखील समसमानचा नारा दिला आहे. त्यामुळे त्यांच्यात एकमत झाले नाही. तरीही शेवटपर्यंत सर्वच पक्ष युती, आघाडी संदर्भात प्रयत्नशील आहेत. आज शेवटची रात्र आहे. रात्रभऱ्यात समीकरण कसे बदलते यावर अवलंबून आहे. त्यानंतर उद्याच सर्वच पक्ष कुणासोबत घरोबा करणार हे स्पष्ट होणार आहे. शेवटी काहीही झाले, तरी तुझ माझ जमेना, तुझ्यावाचून करमेना अशी म्हणायची वेळ सर्वच पक्षांवर आली आहे.

## भाजपमध्ये नाराजीचा सूर

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. २९

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच आता शहर भाजपमध्ये सुद्धा नाराजीचा सूर उमटला असून कालपरवा पक्षात आलेल्यांना भाजपने उमेदवारी दिल्याने नाराजी नाट्य उघडकीस आले आहे.

भाजपमध्ये अनेक निष्ठावान कार्यकर्ते आहेत. आज ना उद्या आपण महापालिकेत बसू अशी स्वप्ने हे कार्यकर्ते पहात होते. मात्र, मागील काही दिवसांपासून भाजपने इनकमिंग सुरू केल्याने दुसऱ्या पक्षातील नेते मोठ्या प्रमाणात भाजपात प्रवेश करीत आहेत. प्रभाग १५ मध्ये निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून भाजपने नव्यानेच पक्षात प्रवेश केलेल्या दोन महिलांना उमेदवारी दिल्यामुळे निष्ठावान कार्यकर्ते संतप्त झाले आहेत. या कार्यकर्त्यांनी सोमवारी थेट केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांचे निवासस्थान गाठून आपली नाराजी व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु, गडकरी निवडणूक कार्यक्रमात व्यस्त असल्याने या कार्यकर्त्यांची त्यांची भेट होऊ शकली नाही.

त्याचवेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे गडकरी यांच्या घरी आले. भाजपच्या कार्यकर्त्यांनी बावनकुळे यांचे वाहन थांबवून आपली व्यथा त्यांच्यासमोर मांडली. त्यावर बावनकुळे यांनी तुम्ही गडकरी यांच्याशी बोला असे बोलून पुढे काढता पाय घेतला. त्यानंतर एका महिला कार्यकर्त्यांनी रडत रडत प्रसार माध्यमांसमोर आपली कैफियत मांडली. आम्ही अनेक वर्षापासून भाजपमध्ये निष्ठेने काम करीत आहोत. कुठलाही कार्यक्रम असो आम्ही नाही म्हटले नाही. मुकाट्याने काम करीत होतो. आता कालपरवा पक्षात आलेल्या लोकांना उमेदवारी देण्यात येत आहे. आम्ही वर्षानुवर्षे हेच काम करायचे काय? असा प्रश्न त्या महिलेने प्रसार माध्यमांसमोर उपस्थित केला. अशीच व्यथा अन्य कार्यकर्त्यांनी देखील व्यक्त केली. तुम्ही पक्षातीलच अन्य कार्यकर्त्यांना उमेदवारी द्या, परंतु, पक्षात नव्याने आलेल्यांना उमेदवारी देऊ नका असेही या कार्यकर्त्यांनी म्हटले. ही समस्या केवळ प्रभाग १५ मध्येच नसून अन्य प्रभागांमध्ये देखील असल्याचे चित्र आहे.

**बंडखोरी होणार**

भाजपा हा शिस्तप्रिय पक्ष म्हणून ओळखल्या जातो. पक्षाने ज्यांना उमेदवारी दिली त्यांच्यासाठी कार्यकर्ते जोमाने कामाला लागतात. मात्र, अन्य पक्षातून आलेल्या लोकांना उमेदवारी देण्यात येत असेल, तर भाजपमध्ये देखील बंडखोरीची शक्यता नाकारता येत नाही. हे चित्र उद्या मंगळवारी स्पष्ट होईल.



### काँग्रेसमध्ये तशीच स्थिती

काँग्रेसने अजूनपर्यंत आपले उमेदवार जाहीर केले नाहीत. बंडखोरी टाळण्यासाठी काँग्रेस नेते सावध भूमिका घेत आहेत. काँग्रेसमध्ये देखील अनेक कार्यकर्ते निवडणूक लढविण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून आहेत. सोमवारपर्यंत काँग्रेस विविध पक्षांशी युतीची बोलणी करण्यात व्यस्त होते. मात्र, वंचितसोबतची त्यांची बोलणी फिस्कटली. वंचितने स्वबळाचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे काँग्रेसने ज्यांना उमेदवारी दिली आहे त्यांना एबी फॉर्मचे देखील वाटप केले आहे. ज्यांना उमेदवारी मिळणार नाही ते बंडखोरीच्या तयारीत असल्याचे चित्र काँग्रेसमध्ये दिसून येत आहे. खरे चित्र उद्याला दिसणार आहे. भाजपला रोखण्यासाठी काँग्रेस नेते इच्छुक उमेदवारांची समजूत घालणार असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले.

## बंडखोरीच्या भीतीने रात्रीची धावपळ

### एबी फॉर्म वाटपाचा राजकीय खेळ शिगेला

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९

निवडणुकीच्या रणधुमाळीत बंडखोरीचा भडका उडू नये, यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी काल उशिरा रात्रीपर्यंत उमेदवारांना एबी फॉर्म वाटप करत घाईगडबड सुरू ठेवली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्याचा शेवटचा दिवस असल्याने राजकीय पक्षांची तारांबळ उडाल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे. खरे तर आजपर्यंतची राजकीय चर्चा कार्यक्रम, भाषणे आणि प्रचाराभोवती फिरत होती. मात्र आता एकच ध्येय उरले आहे 'बंडोबांना रोखणे!' उद्याचा दिवस सर्वच पक्षनेत्यांसाठी कसोटीचा ठरणार आहे. कारण उमेदवारी न मिळाल्यास बंडखोरी करून अपक्ष म्हणून मैदानात उतरण्याची तयारी अनेक इच्छुकांनी आधीच सुरू केली आहे.

उशिरा रात्री एबी फॉर्म वाटपाचा डाव बंडखोरी टाळण्यासाठी अनेक पक्षांनी एबी फॉर्म शेवटच्या क्षणापर्यंत दडपून ठेवण्याची रणनीती आखली. काल रात्री अचानक उमेदवारांना फोन, मेसेज आणि बंद दरवाजामागील भेटींचे सत्र सुरू झाले. काहींना थेट फॉर्म हातात देण्यात आले, तर काहींना ''उद्या सकाळी भेटा'' असा निरोप देण्यात आला.

**'हाय रिस्क' वॉर्डांत गुप्त वाटप**

ज्या वॉर्डांमध्ये इच्छुकांची संख्या जास्त आहे, अशा हाय रिस्क वॉर्डांतील एबी फॉर्म आज गुप्तपणे वाटप केले जाणार असल्याची जोरदार चर्चा आहे. पक्ष कार्यालयांपेक्षा हॉटेल, खासगी बंगले आणि विश्वासू नेत्यांची कार्यालये ही एबी फॉर्म वाटपाची केंद्रे बनली आहेत. कोणाला फॉर्म मिळाला, कोणाला डावलले, यावरच पुढील राजकीय समीकरण ठरणार आहे.

पक्षनेते एकीकडे उमेदवारांना समजावण्याच्या फेऱ्यात आहेत, तर दुसरीकडे नाराजांना थोपवण्यासाठी आश्वासनांचा पाऊस पाडला जात आहे. ''यावेळी नाही, पुढच्यावेळी संधी देऊ,'' ''समितीत स्थान देऊ,'' अशा शब्दांत बंडखोरी थांबवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## नागपुरात काँग्रेस– वंचितची युती फिस्कटली





युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. २९

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस यांच्यात युतीबाबत सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असल्याची माहिती वंचितचे निवडणूक निरीक्षक प्रा. अनिकेत मून यांनी पत्रपरिषदेत दिली. काँग्रेसने नागपूरसाठी अपमानास्पद आणि अहंकारी युतीची ऑफर दिल्याने ही युती नाकारण्याची आल्याचे त्यांनी पुढे सांगितले.

मुंबईत काँग्रेस आणि वंचित यांची युती जाहीर झाली असली, तरी नागपूरसाठीही त्याच धर्तीवर प्रामाणिकपणे प्रयत्न करण्यात आले होते. मात्र, चर्चेदरम्यान नागपूरच्या नेतृत्वाकडून दिसून आलेली सरंजामी मानसिकता व पाटीलकी वंचितला मान्य नव्हती. आजही काँग्रेस नागपूरचे नेतृत्व बहुजन समाजाकडे मालकीच्या नजरेने पहाते. शाहू, फुले, आंबेडकरवादी आणि बहुजन समाज हा कुणाचीही जहागीर नाही. काँग्रेसची ही पाटीलकी संविधान, लोकशाही आणि बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या मानवता व मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांच्या पूर्ण विरोधात असल्याचा आरोप यावेळी प्रा. मून यांनी केला. नागपुरात काँग्रेससोबत युतीची योजना पूर्णपणे फेटाळून लावली आहे.

### एटीएमची चोरी करून सव्वा लाख पळविले

नागपूर, दि. २९

एटीएम कार्डची चोरी करून सव्वा लाख रुपये पळविणाऱ्या दोन भामट्यांविरुद्ध बेलतरोडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दुर्गानगर येथे राहणारे दुर्गाप्रसाद तुकडोदास गौतम (३८) हे बांधकाम ठेकेदार आहेत. १९ डिसेंबर रोजी त्यांना कामगारांना पैसे द्यायचे होते. त्यामुळे ते चिंचभवन येथील बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये गेले. तेथे आधीपासून एक मुलगा हजर होता. गौतम एमटीएममध्ये जाताच तो मुलगा निघून गेला. गौतम यांनी मशीनमध्ये एटीएम कार्ड टाकले असता कार्ड फसले. त्यांनी कार्ड काढण्याचा प्रयत्न केला असता कार्ड निघाले नाही. त्यानंतर दुसरा एक मुलगा तेथे आला.

## मनसेत नाराजीचा सूर तीव्र

### यशवंत किल्लेदार यांना उमेदवारी दिल्याने स्थानिक नेतृत्व अस्वस्थ

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत (मनसे) अंतर्गत नाराजीचे वातावरण चिघळताना दिसत आहे. महापालिका वॉर्ड क्रमांक १९२ मधून यांना मनसेकडून उमेदवारी जाहीर केल्यामुळे पक्षातील ज्येष्ठ व स्थानिक पातळीवर भक्कम पकड असलेल्या नेत्यांमध्ये तीव्र नाराजी पसरल्याची माहिती आहे.

वॉर्ड १९२ हा मनसेसाठी महत्त्वाचा मानला जातो. या वॉर्डमधून गेल्या अनेक वर्षांत पक्षाचा चांगले यश मिळाले असून स्थानिक कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे तयार झाले आहे. मात्र उमेदवारी जाहीर करताना स्थानिक नेतृत्वाला विश्वासात न घेतल्याचा आरोप आता उघडपणे होऊ लागला आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वॉर्डमध्ये सातत्याने काम करणारे



अनेक अनुभवी कार्यकर्ते आणि पदाधिकारी उमेदवारीच्या शर्यतीत होते. मात्र त्याऐवजी यशवंत किल्लेदार यांना उमेदवारी देण्यात आल्याने ''किल्लेदारी लादली गेली'' अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे.

''ज्यांनी वर्षानुवर्षे जनतेशी संपर्क ठेवला, प्रश्नांसाठी लढा दिला, त्यांना डावलून निर्णय घेतले गेले,'' अशी खदखद नाराज गोटातून व्यक्त केली जात आहे. आधीच मुंबईतील राजकीय समीकरणे बदलत असताना, मनसेतील ही नाराजी पक्षासाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उमेदवारीवरून निर्माण झालेली अस्वस्थता जर पुढील काही दिवसांत शांत झाली नाही, तर बंडखोरी किंवा पक्षत्यागासारख्या टोकाच्या पावले उचलली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

**वॉर्ड १९२ मध्ये लढत रंगणार**

यशवंत किल्लेदार यांना उमेदवारी दिल्यानंतर वॉर्ड १९२ मधील लढत अधिकच रंजक बनणार आहे. एकीकडे मनसेचा अधिकृत उमेदवार, तर दुसरीकडे नाराज कार्यकर्त्यांची भूमिका काय राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उमेदवारीच्या निर्णयामुळे निर्माण झालेली नाराजी मनसेच्या निवडणूक रणनितीवर कितपत परिणाम करणार, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

## जागा नव्हे, विजय महत्त्वाचा राज ठाकरेंचा पहिला आदेश

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९

गेल्या अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या वाटांवर असलेले ठाकरे कुटुंब पुन्हा एकत्र येत असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले असून, आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणि यांची राजकीय जवळीक महाराष्ट्राच्या राजकारणात निर्णायक वळण घेणारी ठरण्याची शक्यता आहे. शिवसेना (उबाठा) गट आणि मनसे यांची निवडणूक आघाडी जाहीर होताच राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट आदेश देत ''जागा नव्हे, विजय महत्त्वाचा'' असा ठाम राजकीय संदेश दिला आहे.

मुंबईतील येथे झालेल्या मनसेच्या विशेष मेळाव्यात बोलताना राज ठाकरे यांनी युतीतील जागावाटपावरून चर्चा सुरू असल्याचे मान्य केले, मात्र त्याला दुय्यम स्थान देत थेट रणशिंग फुंकले. ''मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी आणि मुंबई वाचवण्यासाठी जागांची संख्या क्षुल्लक आहे. प्रत्येकाने विजयाला प्राधान्य द्या,'' असे निर्देश त्यांनी



कार्यकर्त्यांना दिले.

**''मुंबई वाचवायची असेल तर एकजूट हवी''**

राज ठाकरे म्हणाले, ''कुणाला किती जागा मिळाल्या, यात वेळ घालवू नका. संकट ओळखा. आज गाफील राहिलो तर उद्या मुंबई आपल्या हातातून निसटेल. दुसऱ्यांची वाईट स्वप्ने गाडायची असतील, तर आता एकजुटीने मैदानात उतरण्याची वेळ आली आहे.'' या शब्दांतून त्यांनी आगामी निवडणूक केवळ राजकीय नव्हे, तर अस्तित्वाची लढाई असल्याचे स्पष्ट केले.

मेळाव्यात राज ठाकरे यांनी केंद्र व राज्य सरकारवरही जोरदार टीका केली. ईव्हीएमचा मुद्दा पुन्हा उपस्थित करत ते म्हणाले, ''आज ईव्हीएम आणि मोदींच्या जोरावर माज दिसतोय. पण सत्ता नसली तरी आपला दबदबा आजही कायम आहे.'' या विधानातून त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास पेरण्याचा प्रयत्न केला.

उमेदवारांना फॉर्म देण्याच्या प्रक्रियेबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले, ''आज फॉर्म घ्या, उत्साहात भरा. ही केवळ सुरुवात आहे. प्रत्यक्ष प्रचारात मी सर्व गोष्टी पुराव्यासकट समोर आणणार आहे.'' या घोषणेमुळे आगामी प्रचार अधिक आक्रमक होण्याचे संकेत मिळत आहेत.

**मराठी मतांचे ध्रुवीकरण?**

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अनेक वर्षांनंतर ठाकरे बंधू एकाच राजकीय उद्देशाने जवळ आले आहेत. त्यामुळे मराठी मतांचे विभाजन थांबेल का, आणि मुंबईच्या राजकारणाचा समतोल बदलेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मातोश्रीवर मध्यरात्री नेमकं काय घडलं ?

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मातोश्रीवर काल मध्यरात्रीपर्यंत राजकीय घडामोडी घडत राहिल्या आणि त्याचवेळी ठाकरे गटात मोठं नाराजी नाट्य उफाळून आलं. रात्री तब्बल २.३० वाजेपर्यंत उमेदवारांना एबी फॉर्म वाटप आणि बैठकांचा सिलसिला सुरू होता. मात्र याच बैठकीदरम्यान अनिल परब यांनी तडक बैठक सोडल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून मुंबई महापालिकेसाठी उमेदवारांची अंतिम तयारी सुरू असून, काल रात्री मातोश्रीवर निवडक उमेदवारांना बोलावून एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले. काही उमेदवारांना कालच फॉर्म देण्यात आले, तर उर्वरित उमेदवारांना आज सकाळी एबी फॉर्म देण्यात येणार आहेत. मात्र या प्रक्रियेदरम्यान एका उमेदवारीवरून ठाकरे गटातील बड्या नेत्यांमध्ये तीव्र मतभेद झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

वादाचा केंद्रबिंदू वॉर्ड क्रमांक ९५

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वांद्र्यातील वॉर्ड क्रमांक ९५ येथील उमेदवारीवरूनच सगळा वाद पेटला. या वॉर्डमधून हरी शास्त्री यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. हरी शास्त्री हे श्रीकांत सरमळकर यांचे जावई असून, सरमळकर हे स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जात होते. मात्र हरी शास्त्री यांना उमेदवारी देण्यास अनिल परब यांचा तीव्र विरोध होता, अशी माहिती आहे. दुसरीकडे, आमदार वरुण सरदेसाई मात्र शास्त्री यांच्या उमेदवारीच्या बाजूने ठाम उभे होते. याच मुद्द्यावरून दोघांमध्ये तीव्र शाब्दिक चकमक झाली आणि वातावरण चांगलंच तापलं.

वाद वाढत गेल्यानंतर अनिल परब यांनी कोणतीही तडजोड न करता तडक मातोश्री सोडली, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

### पत्नीचा खून करणाऱ्या पतीला जन्मठेपेची शिक्षा

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. २९

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा खून केल्याचा गुन्हा सिद्ध झाल्याने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश दिनेश सुराणा यांनी संदीप पद्माकर घोरमाडे (४२) ईसापूर (खु), ता. काटोल यास जन्मठेप सुनावली. संदीपचे चित्रा घोरमाडे (३२) हिच्यासोबत लग्न झाले होते. संदीपला दारूचे व्यसन होते. काही ना काही कारणावरून तो चित्रासोबत वाद घालून तिच्या चारित्र्यावर संयश घेत असे. याच कारणावरून १३ मे २०२२ रोजी त्याने चित्राचा खून केला होता. याप्रकरणी चित्राची आई पंचफुला अडकने (४८) हिच्या तक्रारीवरून काटोल पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून संदीपला अटक केली होती. काटोलचे पो. नि. महादेव आचरेकर यानी याप्रकरणाचा तपास करून आरोपीविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. न्यायालयात आरोपी संदीपवर खुनाचा गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायाधीश सुराणा यांनी त्याला जन्मठेप आणि २० हजार रुपये दंड सुनावला. सरकारच्या वतीने सहायक सरकारी वकील जी. एन. दुबे यांनी बाजू मांडली.

## शरद पवार गटाला मुंबईत मोठा धक्का

### मुंबई जिल्हा अध्यक्ष राखी जाधव यांचा भाजपमध्ये प्रवेश



युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९

मुंबईच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडली असून राष्ट्रवादी काँग्रेसशरदचंद्र पवार गटाला जोरदार धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) यांच्या मुंबई जिल्हा अध्यक्ष यांनी सोमवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. त्यांच्या या पक्षांतरामुळे आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटाचं मुंबईतील संघटन कमकुवत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसशरदचंद्र पवार गट मजबूत करण्याची जबाबदारी राखी जाधव यांनी एकहाती सांभाळली होती. महापालिका निवडणुकीच्या तिकीटवाटप प्रक्रियेतही त्यांची भूमिका महत्त्वाची होती. मर्यादित ताकद असूनही कार्यकर्ते एकत्र ठेवणे, संघटन वाढवणे आणि पक्ष टिकवून ठेवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. मात्र, आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंशी युती झाली असली, तरी राष्ट्रवादीच्या वाट्याला अपेक्षेप्रमाणे जागा न मिळाल्याने पक्षांतर्गत तीव्र नाराजी निर्माण झाली होती.

सूत्रांच्या माहितीनुसार, राखी जाधव यांनी पक्षाला तब्बल ५२ उमेदवारांची यादी दिली होती आणि किमान ३० जागा मिळाव्यात यासाठी वरिष्ठ पातळीवर ठोस प्रयत्न होतील, अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र, ही अपेक्षा पूर्ण न झाल्याने त्या अस्वस्थ झाल्या. युतीत राष्ट्रवादी काँग्रेसशरदचंद्र पवार गटाच्या वाट्याला मर्यादित जागा आल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजी वाढली होती आणि या नाराजीचा ताण थेट मुंबईच्या नेतृत्वावर, म्हणजेच राखी जाधव यांच्यावर येत होता.

याशिवाय, ''ज्यांच्याविरोधात वर्षानुवर्षे राजकीय संघर्ष केला, त्यांच्यासोबत पुन्हा कसे काम करायचे?'' असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाल्याचे बोलले जाते. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर त्यांनी भाजपमध्ये जाण्याचा निर्णायक निर्णय घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

### चिंचभवनमध्ये घराला आग

नागपूर, दि. २९

भर हिवाळ्यातही आगीच्या घटना थांबण्याचे नाव नाही. दररोज कुठे ना कुठे आगीची घटना पुढे येत आहे. शनिवारी एका निर्माणाधिन इमारतीत आगीमुळे वृद्ध सुरक्षा रक्षकाचा मृत्यूची घटना ताजी असतानाच रविवारीही आगीची एक घटना पुढे आली. चिंचभवन परिसरातील एका घराला सायंकाळच्या सुमारास आग लागल्याने प्रचंड खळबळ उडाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि मोठी घटना टळली.

अग्निशमन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, चिंचभवनच्या मेहरबाबा कॉलनीतील एका घराला सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. पाहता-पाहता आगीने रौद्ररूप धारण करीत संपूर्ण घराला कवेत घेतले. आग पाहून आसपासच्या नागरिकांमध्ये खळबळ उडाली. तात्काळ अग्निशमन विभागाला घटनेची माहिती देण्यात आली. २ बंबांसह अग्निशमन जवान घटनास्थळी पोहोचले.

## गद्दारी की बंडखोरी? निवडणुकीच्या रणधुमाळीतला हमखास शब्द

दीपक कैतके
मुंबई, दि. २९

राज्यभरात २९ महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. उद्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस. आज प्रत्येक पक्षाच्या कार्यालयात धावपळ, नाराजी, गुप्त बैठका आणि फोनाफोनीचा धडाका सुरू आहे. कारण एकचतिकीट.

ज्यांना उमेदवारी मिळणार नाही, त्यातील अनेक जण पक्षाशी निष्ठा तोडून अपक्ष किंवा प्रतिस्पर्धी आघाडीच्या झेंड्याखाली उमेदवारी दाखल करतील. तेव्हा लगेच राजकीय शब्दकोशातले दोन शब्द ऐकू येतात''गद्दार'' आणि ''बंडखोर''. गंमत म्हणजे, एकाच व्यक्तीसाठी हे दोन्ही शब्द वापरले जातात; फरक फक्त पाहणाऱ्याच्या नजरेत असतो.

पक्षाच्या दृष्टीने पाहिलं, तर गद्दारी म्हणजे पक्षशिस्त मोडणे. संघटनात्मक निर्णय स्वीकारण्याऐवजी स्वतःचा स्वार्थ, स्वतःची महत्त्वाकांक्षा पुढे ठेवणे. उमेदवारी न मिळाल्यामुळे बंड पुकारणे, प्रचारकाळात पक्षाविरोधात काम करणे किंवा थेट विरोधी गोटात जाणेहे सर्व पक्षाच्या नजरेत गद्दारीच असते.

विशेषतः सत्ताधारी पक्ष असो वा विरोधक, दोघांनाही ''एकसंघ ताकद'' दाखवायची असते. त्यामुळे गद्दार हा शिक्का लावून इतरांना धडा देण्याची राजकीय गरज निर्माण होते. महायुती असो किंवा आघाडीदोन्हीकडे हीच भाषा ऐकू येते. ''पक्षाने मोठं केलं, आज पद दिलं, सत्ता दिली, तरी ऐनवेळी साथ सोडली'' हा गद्दारीचा आरोप केला जातो. हा आरोप केवळ नैतिक नाही; तो राजकीय शस्त्र असतो.

तेच चित्र जर उमेदवाराच्या नजरेतून पाहिलं, तर कथा वेगळी आहे. ''मी वर्षानुवर्षे काम केलं. वॉर्डात घाम गाळला. जनतेशी नाळ जोडली. तरीही वरिष्ठांनी दुर्लक्ष केलं.''

बंडखोरी म्हणजे अन्यायाविरोधात उभं राहणं, असा दावा केला जातो. पक्षात घराणेशाही, मर्जीतील उमेदवार, आर्थिक गणितं किंवा वरिष्ठ नेत्यांचे दबाव असतील, तर ''मी जनतेसाठी लढतोय'' अशी भूमिका घेतली जाते. आघाडीतील काही घटक पक्षांमध्ये ही भावना अधिक तीव्र दिसते, तर महायुतीत सत्तेचा वाटा, पदांचं गणित आणि अंतर्गत स्पर्धेमुळे बंडखोरी उफाळून येते.

**आघाडी आणि महायुती दोघांचीच कोंडी**

महाविकास आघाडी असो किंवा महायुतीदोघांनाही बंडखोरी डोकेदुखी ठरत आहे. आघाडीत वैचारिक मतभेद, स्थानिक नेतृत्वाची नाराजी आणि जागावाटपातील कुरघोडी बंडखोरीला खतपाणी घालते. महायुतीत मात्र सत्ता, निधी, प्रभाव आणि ''विजयाची खात्री'' या सगळ्यामुळे इच्छुकांची संख्या वाढते आणि तिकीट न मिळाल्याने बंड पुकारलं जातं.

दोन्हीकडे एक समान बाब आहेशब्दांचा वापर राजकीय सोयीप्रमाणे बदलतो. आज जो बंडखोर आहे, तो उद्या जिंकून आला तर ''स्वतंत्र विचारांचा नेता'' ठरतो. आणि तोच पराभूत झाला, तर ''गद्दार'' हा ठपका कायमचा बसतो.

**मतदारासाठी काय महत्त्वाचं?**

खरा प्रश्न असा आहेगद्दार आणि बंडखोर या शब्दांच्या पलीकडे मतदाराने काय पाहावं?

पक्षशिस्त महत्त्वाची आहे, पण लोकशाहीत उमेदवाराची कामगिरी, प्रामाणिकपणा आणि जनतेशी नातं यालाही तितकंच वजन आहे. केवळ पक्ष बदलला म्हणून तो माणूस वाईट ठरत नाही; आणि केवळ पक्षाशी एकनिष्ठ आहे म्हणून तो चांगलाच असेल, याचीही हमी नाही.

युवाराष्ट्र दर्शन

# चंद्रपूर जिल्हा



मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५

## सतत नापिकी व वाढत्या कर्जाचा बोजा ; सातरी येथील शेतकऱ्याची आत्महत्या



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
राजुरा दि.२९ : सातरी येथील युवा शेतकरी तोशीस मनोहर कोंडेकर वय २८ यांनी काल दि.२७ डिसेंबर रोज शनिवारला सायंकाळी ७.०० वाजता कीटकनाशक घेऊन आत्महत्या करून आपले जीवनयात्रा संपविले.

सदर शेतकरी हा आपल्या आई सोबत राहत होता.

सततच्या नापिकीमुळे त्याच्यावर कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत गेले. त्यातून नैराश्य आले व त्यांनी हा शेवटचा निर्णय घेतला. त्यांच्या कुटुंबावर बँक ऑफ इंडिया शाखा विहिरगाव चे १,४०००० हजार रुपयाचे पिक कर्ज होते. त्याच्या या निर्णयामुळे आई उघड्यावर पडली आहे व तो एकमेव करता पुरुष असल्यामुळे त्याच्या कुटुंबाचा आधारच हिरावला गेला आहे व जीवन जगण्याचा मार्ग उरला नाही. त्याची अंत्य संस्कार सातरी येथील मोक्षधाम येथे करण्यात आला. त्याच्या मृत्यूमुळे गावात शोककळा पसरली आहे.कर्जापाई युवा शेतकऱ्याची आत्महत्या समाजमन सुन्न करणारी आहे.

# नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस

## राजकीय पक्षांकडून उमेदवारी जाहीर होण्यास विलंब



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२९** : येथील महानगरपालिका निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी उद्या ३० डिसेंबर ला शेवटचा दिवस असतानाही प्रमुख राजकीय पक्षांकडून अद्यापपर्यंत अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवार, कार्यकर्ते आणि मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. भाजप मधील अंतर्गत गटबाजीमूळे उमेदवारीवर अंतिम शिक्कामोर्तब होण्यास विलंब होत आहे.तर काँग्रेस, शिवसेना (उबाठा) व वंचित यांच्यातील जागा वाटपावरुन युती फिस्क्टलेली आहे.शिवसेना (उबाठा) व वंचित समसमान जागावंर एकत्रित लढणार आहेत.यामूळे राजकीय समीकरण बदलण्याचे संकेत दिसून येत असून मत विभाजनाचा फटका कोणाला बसणार याकडे बघितले जात आहे.

पक्षांतर्गत गटबाजी, स्थानिक समीकरणे, आरक्षणातील बदल, संभाव्य बंडखोरीचा धोका यामुळे उमेदवार निश्चितीला विलंब होत आहे. यामूळे काँग्रेस व भाजपाने अंतिम यादी शेवटच्या दिवशी अधिकृत उमेदवारांचे एबी फार्मसह नामांकन अर्ज दाखल करतेवळी स्पष्ट होणार आहे.

## गटबाजी टाळण्यासाठी वेळेवर उमेदवारी अर्ज दाखल होणार

पक्षांतर्गत गटबाजी टाळण्यासाठी राजकीय पक्षांकडून शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला जात असल्याचे संकेत मिळत आहेत. शेवटच्या क्षणी होणारी उमेदवार घोषणेमुळे निर्माण होणारी नाराजी, बंडखोरी आणि अंतर्गत मतभेद टाळण्यासाठी पक्ष नेतृत्वाने समन्वयाची भूमिका स्वीकारली आहे.प्रमुख पक्षांमध्ये उमेदवार निवडीबाबत अंतिम चर्चा पूर्णत्वास येत असून, बहुतेक प्रभागांत एकमताने उमेदवार निश्चित करण्यावर भर देण्यात येत आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी स्थानिक पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि इच्छुक उमेदवारांशी स्वतंत्र बैठका घेऊन परिस्थितीचा आढावा घेतल्याची माहिती आहे.काही इच्छुकांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल करण्याची तयारी ठेवली असली, तरी अधिकृत 'ए' व 'बी' फॉर्म मिळेल या अपेक्षेने अनेकजण शेवटपर्यंत थांबले आहेत.

### प्रशासन सज्ज

निवडणूक प्रशासनाने नामनिर्देशन प्रक्रियेसाठी सर्व तयारी पूर्ण केली असून, शेवटच्या दिवशी होणारी गर्दी लक्षात घेता अतिरिक्त कर्मचारी आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नियमांनुसार उद्या ३० डिसेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत नामनिर्देशन स्वीकारले जाणार आहे.

### राजकीय वातावरण तापले

उमेदवारी जाहीर न झाल्याने स्थानिक राजकीय वातावरण तापले आहे. शेवटच्या क्षणी यादी जाहीर होऊन काही ठिकाणी बंडखोरी होणार की समन्वय साधला जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ३० डिसेंबर शेवटच्या दिवशी सकाळी उमेदवारांचे चित्र स्पष्ट होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मनपा निवडणूकीसाठी पाचव्या दिवशी ३०० नामनिर्देशन पत्रांची उचल

### आतापर्यंत ७१ नामनिर्देशन पत्र दाखल

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२७** : चंद्रपुर महनगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी आज २९ डिसेंबर रोजी नामनिर्देशन दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी ६६ नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले.व ३०० नामनिर्देशन पत्रांची उचल करण्यात आली.आतापर्यंत एकूण ७१ नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले आहे.उद्या ३० डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख आहे.

मनपा सार्वत्रिक निवडणूकीसाठी नामनिर्देशन दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची ५ कार्यालये मिळुन एकुण १७३ इच्छूकांनी ३०० नामनिर्देशन पत्रांची उचल केली. नामनिर्देशन पत्रे ही केवळ प्रत्यक्षरित्याच (ऑफलाईन) सादर करता येत आहेत.उद्या ३० डिसेंबर २०२५ (मंगळवार) शेवटच्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत नामनिर्देशन पत्र दाखल करता येणार आहे.

**प्रभागनिहाय अर्जाची उचल व अर्ज दाखल**

(प्रभाग क्र. १,२ व ५) - २४ इच्छुकांद्वारे ३७ अर्जांची उचल व ११ अर्ज दाखल, (प्रभाग क्र. ३,४ व ६) - ३७ इच्छुकांद्वारे ५९ अर्जांची उचल व १८ अर्ज दाखल, (प्रभाग क्र. ७,८ व ९) - ५० इच्छुकांद्वारे ९७ अर्जांची उचल व १४ अर्ज दाखल, (प्रभाग क्र. १०,११,१२ व १५) - ४० इच्छुकांद्वारे ७२ अर्जांची उचल व १८ अर्ज दाखल, (प्रभाग क्र. १३,१४,१६ व १७) - २२ इच्छुकांद्वारे ३५ अर्जांची उचल व ५ अर्ज दाखल करण्यात आली आहे.

## छत्रपती क्रीडा मंडळातर्फे नगराध्यक्ष प्रफुल चटकी यांचा सन्मान



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**भद्रावती दि.२९** : शहराच्या क्रीडा क्षेत्रातून नेतृत्वापर्यंतचा प्रवास यशस्वीपणे पूर्ण करत नगर परिषद निवडणुकीत विजय मिळवून निवडून आलेले भद्रावती नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रफुल चटकी यांचा छत्रपती क्रीडा मंडळाच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी जाऊन सन्मान करण्यात आला. हा सन्मानप्रसंग सन्मानपूर्वक पार पडत शहरातील क्रीडा संस्कृतीला नवे बळ देणारा ठरला.

या विशेष प्रसंगी छत्रपती क्रीडा मंडळाच्या वतीने नगराध्यक्ष प्रफुल चटकी यांना राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवरायांच्या प्रतीकाने गौरविण्यात आले. हे प्रतीक केवळ सत्कारापुरते मर्यादित नसून शिस्त, संयम आणि नेतृत्व या मूल्यांचे प्रतीक असल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. शिवरायांच्या आदर्शांप्रमाणे भद्रावतीतील खेळाडू घडावेत आणि शहराला सक्षम नेतृत्व लाभावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. हा सन्मान भद्रावती शहरातील खेळाडूंना योग्य दिशा, सुविधा आणि सातत्यपूर्ण पाठबळ मिळावे, या भूमिकेतून करण्यात आला. शहरातील अनेक तरुण खेळाडू जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करत असून, त्यांना योग्य व्यासपीठ व संधी मिळणे अत्यावश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. खेळाडू घडवणे म्हणजे केवळ मैदानावर विजय मिळवणे नव्हे, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त, संयम आणि नेतृत्वगुण रुजवणे होय, अशी महत्त्वपूर्ण भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. हे विचार छत्रपती क्रीडा मंडळाच्या ध्येयाशी सुसंगत असून, मंडळ शहरातील क्रीडा विकासासाठी सातत्याने कार्यरत असल्याचे नमूद करण्यात आले.

या सन्मानप्रसंगी मंडळाचे मुख्य संयोजक शंकर बोरघरे, ज्येष्ठ खेळाडू व संघटक सागर मोरे, राष्ट्रीय खेळाडू धीरज पाशी, राष्ट्रीय खेळाडू सागर अंबाघरे तसेच मंडळातील सर्व सदस्य व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे हा सन्मानप्रसंग अधिक अर्थपूर्ण ठरला.यावेळी नगराध्यक्ष प्रफुल चटकी यांनी सत्काराबद्दल आभार व्यक्त करत, भद्रावतीतील खेळाडूंना सक्षम व्यासपीठ, मूलभूत सुविधा आणि आवश्यक प्रोत्साहन देण्यासाठी नगरपालिकेच्या माध्यमातून सकारात्मक सहकार्य राहील, असा ठाम विश्वास व्यक्त केला.उपस्थित मान्यवरांनी मत व्यक्त केले की, छत्रपती क्रीडा मंडळाचा हा उपक्रम शहरातील क्रीडा संस्कृती अधिक बळकट करणारा ठरेल.

## डॉ.धनराज खानोरकरांचा 'सिमग्याच्या बोंबा अन् चवरीच्या सेंगा' कवितासंग्रह प्रकाशित



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**ब्रम्हपुरी दि.२९** : ब्रह्मपुरीच्या नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख कवी, लेखक डॉ धनराज खानोरकर यांच्या अस्सल झाडी बोलीतल्या विनोदी काव्यसंग्रहाचे प्रकाशन काटलीतील ३३ व्या झाडी बोली साहित्य संमेलनात बोली महर्षी डॉ हरिश्चंद्र बोरकर, अँड लखनसिंह कटरे, डॉ राजन जसस्वाल यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी डॉ हेमकृष्ण कापगते, ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर, डॉ संजय निंबेकर, लोकराम शेंडे,अरुण झगडकर,प्रा विनायक धानोरकर इ.मान्यवर उपस्थित होते. सदर काव्यसंग्रह हा अस्सल झाडी बोलीतला मिस्किल विनोदी काव्यसंग्रह असून डॉ. खानोरकरांचा हा पाचवा काव्यसंग्रह आहे. मुंबईच्या संधीकाल प्रकाशनाने तो काढला असून नाशिकच्या डॉ. तुषार चांदवडकरांची प्रस्तावना व झाडी बोली चळवळीचे प्रवर्तक डॉ हरिश्चंद्र बोरकरांचे आशीर्वादपर भाष्य आहे.या कवितासंग्रहात झाडी बोली व्याकरणाचे नियम पाळले असून कवीने आपल्या मायबोलीत लिहिलेले आणि पोटभर हसवून प्रसंगी गंभीरही करणारे कवी धनराजचे हे अस्सल धन आहे, असा आशीर्वाद झाडी बोली प्रवर्तक डॉ हरिश्चंद्र बोरकरांनी दिला आहे.

## जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२९** : क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचा गौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणेच्या वतीने जिल्ह्यातील तीन सर्वोत्कृष्ट गुणवंत खेळाडू (महिला, पुरुष व दिव्यांग) व एक गुणवंत क्रीडा मार्गदर्शकाला पुरस्कार दिले जातात.

त्या अनुषंगाने सन २०२४-२५ करिता चंद्रपूर जिल्ह्यातील खेळाडू, व क्रीडा मार्गदर्शक यांच्याकडून जिल्हा क्रीडा पुरस्काराकरिता अर्ज मागविण्यात येत आहे. सदर अर्ज १२ जानेवारी २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे क्रीडा अधिकारी मोरेश्वर गायकवाड यांच्याकडे उपलब्ध आहे. तसेच हे अर्ज १२ जानेवारी २०२६ रोजी पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे. उशीरा येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाही.

अर्ज सादर करताना अर्जदाराचे महाराष्ट्रात सलग १५ वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे. तसेच क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत १० वर्ष महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केले असले पाहिजे व त्यांनी वयाची ३५ वर्ष पुर्ण केलेली असणे आवश्यक आहे. खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपूर्व ५ वर्षांपैकी २ वर्ष त्या जिल्ह्याच्या मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत खेळामध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे. तसेच अर्ज करीत असतांना शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासननिर्णय दि. १४ डिसेंबर २०२२ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कार नियमातील अटी व शर्तीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

वरील सर्व पुरस्कारामध्ये प्रत्येकी प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व रोख १० हजार रुपये या बाबींचा समावेश आहे. पुरस्काराकरिता निवड झालेल्या पुरस्कार्थींना २६ जानेवारी भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापनदिनी मुख्य शासकीय कार्यक्रमात पालकमंत्री यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पूंड यांनी कळविले आहे.

## राज्यांतर्गत अन्नधान्य कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिकस्पर्धा

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२९** : राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतक-यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

रब्बी हंगाम २०२५ मध्येही पिकस्पर्धा मागील वर्षाप्रमाणे तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येत आहेत. त्यानुसार कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२५ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकासाठी पिकस्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल. पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थ्यांच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ),ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास), पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा जोडणे आवश्यक, बँक खाते चेक/पासबुक च्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.रब्बी हंगामामध्ये पीक स्पर्धेची अर्ज दाखल करण्याची तारीख खालील प्रमाणे राहील. ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस पिकासाठी ३१ डिसेंबर २०२५. तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावरील पिकस्पर्धा निकाल प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पीक स्पर्धा विजेते निवडण्यात येतील.पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी ३०० रुपये व आदिवासी गटासाठी १५० रुपये

तालुका पातळीवर प्रथम बक्षीस ५ हजार, द्वितीय ३ हजार आणि तृतीय २ हजार रुपये. जिल्हा पातळीवर प्रथम बक्षीस १० हजार, द्वितीय ७ हजार आणि तृतीय ५ हजार रुपये. राज्य पातळीवर प्रथम बक्षीस ५० हजार, द्वितीय ४० हजार आणि तृतीय ३० हजार रुपये.

उपरोक्त नमूद पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी पिक स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

## मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी कर्मचारी यांचे पहिले प्रशिक्षण संपन्न



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.२९** : मतदानाची संपूर्ण प्रक्रिया व्यवस्थित रित्या पार पडावी याकरिता निवडणूक प्रक्रियेत नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना रविवार (ता.२८) व सोमवार (ता.२८) अश्या दोन सत्रात मतदान प्रक्रियेचे प्रथम प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी मनपा निवडणूक अधिकारी तथा आयुक्त अकुनुरी नरेश यांच्या मार्गदर्शनात सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उपस्थितांना संपूर्ण मतदान प्रक्रियेची यथोचित माहिती दिली.

येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या चंद्रपूर महनगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व नियमबद्ध पार पडावी, यासाठी मतदान केंद्रावर काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सलग दोन दिवस प्रियदर्शिनी सभागृह येथे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले.आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अकुनुरी नरेश यांच्या मार्गदर्शनाखाली दोन सत्रांमध्ये या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.दोन्ही दिवसांच्या शिबिरात नायब तहसीलदार सचिन खंडाळे यांनी सर्व मार्गदर्शन केले. मतदान केंद्रावर प्रत्यक्ष काम करणारे मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी यांना आज प्रशिक्षण देण्यात आले. चंद्रपुर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी २०२६ रोजी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी सर्व कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावर लागणारे साहित्य देण्यात येणार असून सदर साहित्य घेवून सर्व पथकांनी त्यांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे.मतदान केंद्राच्या इमारतीपासून १०० मीटर क्षेत्राची रेषा सर्व रस्त्यांवर चुन्याच्या सहाय्याने आखण्यात यावी, मतदान केंद्राच्या वर्ग खोलीत राजकीय व्यक्ती मान्यवर व्यक्ती यांची छायाचित्रे लावलेली असल्यास ती झाकण्यात यावीत, मतदानाच्या गोपनीयतेचा भंग होणार नाही अशारितीने मतदान कक्ष स्थापित करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. या प्रशिक्षणात, मतदान साहित्याची तपासणी व वितरण, मतदार यादीचा वापर, ओळख पडताळणी मतदानाची गोपनीयता राखणे तसेच मतदानानंतर ईव्हीएम सील करण्याच्या प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. आचारसंहिता, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना, आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस यंत्रणेशी समन्वय, तसेच तक्रार निवारणाची पद्धत याबाबत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मतदानाच्या दिवशी कोणतीही चूक अथवा गैरप्रकार होऊ नये, यासाठी प्रत्येक टप्प्यावर नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.प्रशिक्षणादरम्यान प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून ईव्हीएम हाताळणी, मॉक पोल प्रक्रिया, मतदारांच्या शंकांचे निरसन कसे करावे याचेही सादरीकरण करण्यात आले. तसेच मतदान केंद्रावरील अधिकारी कर्मचारी यांना ईव्हीएम मशीन प्रत्यक्ष हाताळणीसाठी देण्यात आले.

## चौरस्ता येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी साजरी



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
चिमूर दि.२९ :तालुक्यातील आंबोली चौरस्ता येथे दिनांक २८ डिसेंबर रोजी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी पित्तर्थ गोपालकाला व महाप्रसादाचा कार्यक्रम हजाराच्या उपस्थितीत पार पडला. चिमूर तालुक्यातील गोंदोडा येथील यात्रेनंतर दुसऱ्या क्रमांकाची या ठिकाणी पुण्यतिथी महोत्सवानिमित्त यात्रा भरत असते.

आंबोली चौरस्ता येथे दरवर्षी दिनांक २६, २७ आणि २८ डिसेंबर रोजी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य यात्रेचे आयोजन केल्या जाते. या कार्यक्रमाला दरवर्षी मोठ्या प्रमाणात भाविक भक्तांच्या उपस्थितीत वाढ होत असून या कार्यक्रमात तिन्ही दिवस भजन स्पर्धा, रामधुन, नामस्मरण, कीर्तन, इत्यादी कार्यक्रम तसेच रक्तदान शिबिरे, विविध आजारावर मोफत तपासणी इत्यादी प्रकारचे कार्यक्रम समाजसेवी संस्थांकडून राबविले गेले.

शेवटच्या दिवशी दिनांक २८ ला ह भ प काळे महाराज यांचे गोपाल काल्याचे किर्तन तसेच मान्यवर चिमूर क्षेत्राचे आमदार कीर्तीकुमार भांगडिया, धनराज मुंगले, घनश्याम डुकरे, यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमात आमदार यांनी भाविक भक्तांना विकासात्मक मार्गदर्शन केले. गोपाल काल्यानंतर लगेच भाविक भक्तांना महाप्रसाद वितरण करण्यात आला.

## श्री संताजी बहुउद्देशीय सेवा मंडळ व विदर्भातली समाज महासंघ ब्रम्हपुरी तालुक्याचा वतीने तेली समाज मेळावा संपन्न




**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**ब्रम्हपुरी दि.२९** : श्री संताजी बहुउद्देशीय सेवा मंडळ व विदर्भातली समाज महासंघ ब्रम्हपुरी तालुक्याचा वतीने स्थानिक विठ्ठल रुक्मिणी सभागृहात तेली समाजाचा भव्य मेळावा नुकताच संपन्न झाला. या मेळाव्याचे उद्घाटन चंद्रपूर जिल्हा महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉक्टर राजेश बेले,अध्यक्ष डॉक्टर वरभे, तर रघुनाथ शेंडे,भाग्यवान खोब्रागडे,उमेशचंद्र चिलबुले, माजी नगराध्यक्ष उराडे ताई,तुळशीदास कुंघडकर,विनायक चिलबुले, प्रतिक हरणे,गोकुळदास बालपांडे,यशवंत आंबोरकर, ठाणेश्वर कायरकर, नामदेव लांजेवार, पॅरिलिना गौतम, अंजली वाडेकर, सुरेखा बालपांडे, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.अर्चना मेहेर,शशिकला मदनकर संचाने सुमधुर स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली,या मेळाव्यात ब्रम्हपुरी नगर परिषद निवडणुकीत नव्याने निवडून आलेले नगर सेवक डॉक्टर नितीन उराडे,मनोज कावळे,रंजना पिसे,राकेश पडोळे, चंद्रकांत बावनकुळे,यांचा सन्मान चिन्ह, शाल श्रीफळ,देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात समाज प्रबोधन,गुणवंत गौरव,वर वाढू स्मरणिका प्रकाशन,ज्येष्ठ नागरिक सत्कार,वर वधू परिचय घेण्यात आले.

गोवर्धन टिकले व अर्चना मरघडे यांना सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले.वर वधू स्मरणिका प्रकाशन करताना संपादक राजेंद्र ठोंबरे यांनी या उपक्रमाची माहिती दिली.दोन हजार समाज बांधव व भगिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते, प्रास्ताविक डॉक्टर सतीश कावळे,पाहुण्याचा परिचय प्रा. रवींद्र विखार यांनी तर संचालन जगदीश मेहेर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रामेश्वर राखाडे,सुयोग बालबुधे, नाथुजी कोल्हे, अरविंद साखरकर पंढरी पिसे,रामकृष्ण कामडी,भाऊराव कावळे,अनंत कळंबे,जनार्दन कावळे,गणेश दांडेकर,मंजुषा साखरकर,कीर्ती झाडे,वनिता करंबे, सुधा बावनकुळे, विश्वपर्थाना कोल्हे,नेहा सेलोकर,माधुरी कावळे, ॲडव्होकेट गिरडकर, परेश सेलोकर,संजय पिसे,यशवंत काम डी,सर्व सदस्य गण यांनी सहकार्य केले.आभार प्रदर्शन मनिषा बंडे हिने मानले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

दैनिक युवाराष्ट्र दर्शन

# यवतमाळ

मंगळवार, ३० डिसेंबर २०२५

जिल्हा



## एकलव्य शाळेत प्रवेशासाठी 1 मार्चला परीक्षा

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २८ डिसेंबर

इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा आदिवासी विकास अप्पर आयुक्तांच्या अधिनस्त प्रकल्प कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी असणार आहे. पुसद येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत ही प्रवेश परीक्षा दि. १ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली असून, परीक्षा केंद्र शासकीय आश्रमशाळा, हर्षी, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे राहणार आहे. इयत्ता सहावीची परीक्षा सकाळी ११ ते १ या वेळेत, तर इयत्ता सातवी ते नववीसाठी सकाळी ११ ते २ या कालावधीत घेण्यात येणार आहे.

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-
गुलमोहर सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०

* एजन्सीसाठी संपर्क

ई-मेल ssawarkar43@gmail.com

# डायलिसिस केंद्राला शॉर्टसर्किटने आग !

## खिडकीच्या काचा फोडून रुग्णांना बाहेर काढले : मोठा अनर्थ टळला !

•युवाराष्ट्र दर्शन उमरखेड / प्रतिनिधी, दि. २९ डिसेंबर



स्थानिक उपजिल्हा रुग्णालयातील नव्याने सुरू झालेल्या डायलिसिस सेवा केंद्रात सोमवार, दि. 29 रोजी दुपारी 1.30 दरम्यान अचानक शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने एकच खळबळ उडाली. कर्मचाऱ्यांनी आपतकालीन खिडकीच्या काचा फोडून डायलिसिस सुरू असलेल्या रुग्णांना वेळीच प्रसंगावधान दाखवून बाहेर काढल्याने सुदैवाने जीवीतहानी टळली . ही आग लागल्यानंतर काही क्षणांतच संपूर्ण डायलिसिस कक्षात धूर पसरला. त्या वेळी उपचार सुरू असलेले रुग्ण उत्तम गेमा जाधव (चिल्ली ) , शेख सादीक (उमरखेड ), पार्वती राठोड (चिल्ली ), कैलास कुबडे (मरसुळ ) , प्रकाश आलट (माळकिनी) , सय्यद मुल्ला (ढाणकी), मंचक कदम (टाकळी), लक्ष्मण जाधव (बोथा) यांना आपतकालीन खिडकी फोडून बाहेर काढण्यात आले यावेळी नातेवाईक तसेच कर्मचारी यांची मोठी धावपळ उडाली. मागील चार महिन्यांपूर्वीच या रुग्णालयात शासनाच्या माध्यमातून गोरगरीब व गरजू रुग्णांसाठी मोफत डायलिसिस सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. तालुक्यातील अनेक रुग्ण आठवड्यातून दोन वेळा, काही पंधरा दिवसांतून एकदा तर काही रुग्ण दररोज डायलिसिससाठी येथे येतात. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून डायलिसिस सुरू असतानाच वीज वारंवार ये-जा होत असल्याने रुग्णांचे मोठे हाल होत असल्याची तक्रार होती. आजही डायलिसिस सुरू असताना अचानक वीजपुरवठ्यातील बिघाड व वाढलेला लोड यामुळे शॉर्टसर्किट होऊन आग लागली. आग लागताच काही उपस्थित कर्मचाऱ्यांनी तसेच रुग्णांच्या नातेवाईकांनी तत्परतेने निर्णय घेत बाजूच्या आपत्कालीन दरवाजे व खिडक्या तोडून रुग्णांना बाहेर काढले.

या प्रसंगात सुदैवाने एकाही रुग्णाला गंभीर इजा झाली नाही; मात्र रुग्ण व नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. यावेळी काही रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, मागील अनेक दिवसांपासून येथे वीजपुरवठा सातत्याने खंडित होत असून हाय व्होल्टेज व लो व्होल्टेजचा त्रास सुरू आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन व संबंधित यंत्रणांकडून याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

> उपजिल्हा शासकीय रुग्णालयातील डायलिसिस सेवा केंद्र एचएलएल (HLL) कंपनीमार्फत चालविले जाते. मागील अनेक दिवसांपासून वीज वितरण कंपनीकडून वीज ये-जा, हाय व्होल्टेज व लो व्होल्टेजचा प्रकार सुरू आहे. रुग्णालयाकडे जनरेटर उपलब्ध असतानाही संबंधित कंपनीकडून त्याचा नियमित वापर केला जात नसल्याचे सांगण्यात येते. वारंवार पत्रव्यवहार करूनही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने आज ही गंभीर घटना घडली मात्र सुदैवाने जिवीतहानी झाली नाही "आमच्याकडे जनरेटर उपलब्ध आहे. मात्र वीजपुरवठ्यातील हाय व्होल्टेज व लो व्होल्टेजमुळे वारंवार अडचणी येत आहेत.
> **— डॉ. संभाजी डोंगे वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, उमरखेड**

# मिरवणुकीत हल्ला करणाऱ्या आरोपीला तात्काळ अटक करा

## राजेंद्र गायकवाड यांची मागणी : पोलिस अधिक्षकांना निवेदन

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. २९ डिसेंबर

नगरपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर आरटीओ ऑफिस समोर दोन गटात हाणामारी झाली होती या प्रकरणांमध्ये शहर पोलिसांनी दोन्ही गटाच्या विरोधात गुन्हे दाखल केले होते दरम्यान यातील केवळ एका आरोपीला ताब्यात घेतले असून उर्वरित नऊ आरोपी अद्यापही बाहेर असल्याचा आरोप शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी केला असून तात्काळ सर्व आरोपींना ताब्यात घ्या अशा आशयाचे निवेदन पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्याकडे दिले आहे.

विजयी मिरवणुकीच्या निमित्ताने दोन गट समोरासमोर आले आणि यांच्यात वाद निर्माण झाला काही लोकांनी चाकू आणि पाईपने एकमेकांवर हल्ला चढविला यात तिघेजण जखमी झाले त्यातील एकाची प्रकृती गंभीर होती दरम्यान शहर पोलिसांकडे तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी गुन्हे दाखल केले होते या प्रकरणात मोहम्मद अजीम मोहम्मद अनीस याला अटक करण्यात आली मात्र उर्वरित नऊ आरोपी अजूनही बाहेर आहेत अतिशय गंभीर स्वरूपाचा गुन्हा असतांना देखील पोलीस आरोपींना आणण्यामध्ये टाळाटाळ करीत असल्याचे यावरून दिसून येते, भविष्यात यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता अधिक आहे तशी भीती परिसरातील नागरिक व्यक्त करीत आहे यातील फरार असलेले नऊ आरोपी हे त्यांच्या नातेवाईकांकडे लपून बसले असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून त्यांना तात्काळ ताब्यात घ्यावे, आणि त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. दिनांक 20 डिसेंबर 2025 रोजी वरील नमूद BNS कलमांन्वये एक गंभीर स्वरुपाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या गुन्ह्यात एकूण 9 आरोपींचा समावेश असून, आज दिनांकापर्यंत (7 दिवस उलटून गेले असतानाही) फक्त एकच आरोपी मोहमद अजिम मोहंमद अनीस यास अटक करण्यात आलेली आहे. उर्वरित सर्व आरोपी अद्याप मोकाट फिरत आहेत. सदर गुन्हा अत्यंत गंभीर स्वरुपाचा असून, उर्वरित आरोपी मोकाट असल्यामुळे पुन्हा वाद निर्माण होण्याची, मारहाणींची व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सुभद्रा काकडे यांचे निधन

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. २९ डिसेंबर



बोरीअरब येथील सुभाष काकडे यांच्या मातोश्री श्रीमती सुभद्राबाई सुदामराव काकडे (वय 87वर्षे) यांचे आज दिनांक 29 डिसेंबरला वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या दि. 30 डिसेंबरला ला दुपारी 12 नंतर त्यांचे राहते घरून बोरी अरब येथुन निघणार आहे. त्यांचे मागे तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहेत.



## प्रेमिला चौधरी यांचा सन्मान

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. २९ डिसेंबर

वणी नगर परिषदेच्या निवडणुकीत मानवी हक्क सुरक्षा परिषदेच्या वणी शहर अध्यक्षा सौ प्रेमिला मनोज चौधरी यांचा विजय झाला आहे. त्याबद्दल मानवी हक्क सुरक्षा परिषदेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे राज्याध्यक्ष राजु धावंजेवार, परशुराम पोटे, सुरेश बन्सोड, भाऊ साहेब आसुटकर, सौ. सुमित्रा ताई गोडे, सौ. सुनिता काळे इत्यादी पदाधिकाऱ्यांनी प्रेमिला ताई मनोज चौधरी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# विनोबा ॲपमध्ये उत्कृष्ट कामगिरी; शिक्षकांचा सन्मान

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दारव्हा, दि. २९ डिसेंबर

जिल्हा परिषद यवतमाळ व ओपन लिंक्स फाउंडेशन यांच्या सामंजस्य करारातून राबविण्यात येणाऱ्या आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम (विनोबा ॲप) अंतर्गत उपक्रमशील शिक्षकांना प्रत्येक महिन्यात 'पोस्ट ऑफ द मंथ पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते. नोव्हेंबर महिन्यांतील तालुकास्तरीय पोस्ट ऑफ द मंथ विजेते पंचायत समिती दारव्हा अंतर्गत सोनाली टाके जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा फुबगाव आणि विद्याधर कुकडे यांचा 24 डिसेंबर रोजी गौरव करण्यात आला.



पोस्ट ऑफ द मंथ' पुरस्कार हा आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमांतर्गत नवोन्मेषी शिक्षण पद्धतींचा अवलंब करणाऱ्या शिक्षकांना ओळखण्यासाठी आणि त्यांना पुरस्कृत करण्यासाठीचा एक उपक्रम आहे. एफएलएन, स्पोकन इंग्लिश आणि महावचन यांसारख्या कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या कौशल्यांमध्ये वाढ करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पण भावनेचाही या कार्यक्रमात गौरव करण्यात आला.

हा सन्मान गटशिक्षणाधिकारी क्रांती खेडकर, विस्तार अधिकारी (शिक्षण) संजय गोगटे, विलास भट्ट व जिल्हा प्रकल्प अधिकारी राम हटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख, शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

## उमरखेड आगारात ३१ डिसेंबरला 'प्रवाशी राजा दिन'

•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी: (प्रतिनिधी)

उमरखेड आगारातील प्रवाशांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी आणि एसटी सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी आगामी ३१ डिसेंबर २०२५ रोजी उमरखेड आगारामध्ये 'प्रवाशी राजा दिन' (प्रवासी तक्रार निवारण दिन) आयोजित करण्यात आला आहे. प्रवाशांच्या तक्रारींची दखल घेऊन त्या तातडीने सोडवण्यासाठी हा विशेष उपक्रम राबविला जाणार आहे.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हा उपक्रम संपूर्ण विभागात राबविला जात आहे. उमरखेड येथे होणाऱ्या या कार्यक्रमाला यवतमाळचे विभाग नियंत्रक कच्छवे स्वतः उपस्थित राहणार असून प्रवाशांच्या थेट तक्रारी जाणून घेणार आहेत. वेळेवर बसेस रद्द होण्याच्या तक्रारी, बस फेऱ्यांचे विस्कळीत झालेले नियोजन, प्रवाशांना मिळणाऱ्या सोयी-सुविधांचा अभाव.कर्मचारी आणि प्रवासी यांच्यातील समन्वयाचे प्रश्न, उमरखेड आगार व्यवस्थापकांनी दिलेल्या माहितीनुसार, हा कार्यक्रम सकाळी १०:०० ते दुपारी २:०० या वेळेत पार पडणार आहे. या काळात प्रवाशांनी आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात किंवा प्रत्यक्ष मांडण्यासाठी उपस्थित राहावे "प्रवाशांच्या प्रत्येक तक्रारीची गंभीर दखल घेऊन प्रशासकीय पातळीवर होणाऱ्या अडचणी दूर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. जास्तीत जास्त प्रवाशांनी या संधीचा लाभ घ्यावा," असे आवाहन उमरखेड आगार प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# वृक्षाची लागवड संगोपनाने शमशेर खान झाले वृक्ष प्रेमी

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी दि. २९ डिसेंबर



आर्णी येथील हिर टॉकीज जवळ हॉटेल परिसरात शमशेर खान दाऊद खान यांनी विविध वृक्ष लावून त्यांचे संगोपन करुन वृक्षप्रेमी झाले आहे. झाडे आपल्या पर्यावरणाचा आणी आपल्या जीवनाचा एक महत्वाचा घटक असून वृक्ष लागवडीने ऑक्सिजन,स्वच्छ हवा, अन्न आणी वन्यजीवासाठी निवास्थान प्रदान करतात, हवामानाचे नियमन, मातीची धूप रोखणे, आणि जैवविविधतेचे सरंक्षण करण्यात ही झाडे महत्वाची भूमिका बजावतात, दरवर्षी पर्यावरण जनजागृती साठी शासन वृक्ष लागवडीचा कार्यक्रम आयोजन करतात. आर्णी येथील शमशेर खान दाऊद खान यांनी वर्ग 9 वी पर्यंत शिक्षण केले आहे, शमशेर खान यांना धार्मिकग्रंथ वाचन करण्याची ही आवड आहे, आपल्या अंगी जन्मता वृक्ष लागवडीची व संगोपनाची आवड असणारा हॉटेल चालक शमशेर खान हा आपल्या हॉटेल परिसरात गूलाब ,चाफा, लिंबू, सिताफळ, स्वस्तिक फूलाची झाडे, तुळस, जांभूळ, नारळ, रामफळ, मुंगणी, शेवती, आलवेरा,चिंचा,उमर,अशा विविध वृक्षांची लागवड केली.

शमशेरने लावलेले सर्वच वृक्ष मोठे झाले असून आता ते परिसरातील नागरिकांना सावली देतात. लावलेल्या वृक्षातून माणसाला आक्सिजन मिळते पर्यावरण मिळते, यामूळे मी वृक्ष लाऊन त्यांचे संगोपन करतो, असल्याची प्रतिक्रीया शमशेर यांनी दिली.

## आंतरराज्यीय गुटखा तस्करीवर कारवाई

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पांढरकवडा, दि. २९ डिसेंबर

तेलंगणा राज्यातून महाराष्ट्रात बंदी असलेला सुगंधित पानमसाला व तंबाखू वाहतूक करणाऱ्या दोन इसमांना ताब्यात घेऊन तब्बल ६५ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ व पांढरकवडा-वणी उपविभागातील अधिकारी व अमलदार सतर्क होते. दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी ढोकी गावाजवळ सापळा रचण्यात आला. संशयित आयशर वाहन क्रमांक UP-94-AT-2305 थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये 'सागर पानमसाला' व 'SR-1 Sended Tobacco' असा बंदी घातलेला माल मोठ्या प्रमाणात आढळून आला. वाहन चालक मोहन सियाराम यादव (वय २६, रा. पिचोड, जिल्हा शिवपुरी, मध्यप्रदेश) व क्लिनर बुध्दा बाबुसिंग परीयार (वय ३५, रा. अमोला थाना, तहसील घसारी, जिल्हा शिवपुरी, मध्यप्रदेश) यांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत १८० पोते सुगंधित पानमसाला व तंबाखू (किंमत ४५,९२,००० रुपये), एक मोबाईल (किंमत अंदाजे ६,००० रुपये) तसेच आयशर वाहन (किंमत अंदाजे २०,००,००० रुपये) असा एकूण ६५,९८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता पेंडकर, धनराज हाके, गजानन राजामलू तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व अमलदारांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे यवतमाळात ध्यान व जीवनशैली कार्यक्रमांचे आयोजन

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २९ डिसेंबर



आर्ट ऑफ लिव्हिंग यवतमाळच्या वतीने शहर व परिसरात ध्यान, जीवनशैली आणि तणावमुक्त जीवनावर आधारित विविध आध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांचे मार्गदर्शन आर्ट ऑफ लिव्हिंगचे वरिष्ठ आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक अमोलजी सागळे (मुंबई) हे करणार आहेत. समाजातील सर्व स्तरातील नागरिकांना मानसिक शांती, सकारात्मक विचार, तणावमुक्त जीवनशैली व मूल्याधिष्ठित जीवनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने हे उपक्रम राबविण्यात येत आहेत. युवक, विद्यार्थी, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी हे कार्यक्रम उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. हे कार्यक्रम यवतमाळ येथील अभ्यंकर कन्या शाळेत ३१ डिसेंबरला असून सायंकाळी ६ ते ९ या वेळेत होणार आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक नागरिक, संस्था व प्रसारमाध्यमांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे आर्ट ऑफ लिव्हिंग यवतमाळचे समन्वयक नीलाशी श्याम गाडवे (DTC, Yavatmal) यांनी कळविले आहे. या उपक्रमांमुळे अनेक युवकांना ध्यानधारणा, मानसिक शांती, शारीरिक तंदुरुस्ती व सकारात्मक जीवनदृष्टी मिळण्यास मदत होणार आहे. अधिक माहितीसाठी संबंधित आयोजकांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही संपूर्ण माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी पत्रकार परिषदेला अरुण सागळे, प्रदीप रेकुलवार, डॉ. प्रमोद यादगीरवार, डॉ. सुभद्रा यादगीरवार, शरद दोनाडकर, शंतनू शेटे, दिनेश चव्हाण, गजानन बिल्लावार, प्रदीप उमरे, डॉ. श्याम गाडवे आदी उपस्थित होते.

# जगदंबा अभियांत्रिकीत येणार सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री स्पृहा जोशी



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २९ डिसेंबर

स्थानिक जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात वार्षीक स्नेहसंमेलन 'विंग्स २६' चे आयोजन २९ ते ३१ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले असून दिनांक ३१ डिसेंबर ला बक्षिस वितरण सोहळ्या करीता मराठी चित्रपटसृष्टीची सुप्रसिद्ध सिने तारीका स्पृहा जोशी उपस्थित राहणार आहे.

अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी माय बाप, मोरया, सुर राहुं दे, बायस्कोप, पैसा पैसा, लॉस्ट ॲण्ड फाऊंड, मला काहिच प्रॉब्लेम नाही, देवा एक अतरंगी, होम स्वीट होम, विक्की वेलिंगकर, अटकन चटकन, कॉफी, एका लग्नाची दुसरी गोष्ट, उंच माझा झोका, एका लग्नाची तीसरी गोष्ट, सुख कळले, सुर नवा ध्यास नवा यांसारख्या चित्रपट व टि. व्हि. सिरियल मध्ये भुमिका साकारुन आपल्या अभिनयाची छाप रसिकांवर उमटवलेली आहे.

या वर्षी स्नेहसंमेलनात फॅशन शो, नृत्य स्पर्धा, फॅन्सी ड्रेस, जेसीईटी झुम, डिबेट, अंताक्षरी, नाट्यस्पर्धा, कबड्डी, क्रिकेट, खो-खो, फुटबॉल आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

वार्षीक स्नेहसंमेलन विंग्स २६ च्या बक्षिस वितरण सोहळयामध्ये क्रिडा स्पर्धांच्या विजेत्यांना पारितोषिके तसेच अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ च्या परिक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार स्पृहा जोशी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. महाविद्यालयामध्ये येत असलेल्या सुप्रसिद्ध सिने तारिकेमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे व जल्लोषाचे वातावरण आहे. उपस्थित राहणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागताकरीता महाविद्यालयीन प्रशासनाने जय्यत तयारी केली असल्याची माहीती संस्थेचे सचिव डॉ. शितल वातीले यांनी दिली.

# शिवाजी विद्यायालत गणितोत्सव साजरा

•युवाराष्ट्र दर्शन पुसद तालुका

स्थानिक श्री.शिवाजी माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय,पुसद येथे प्रसिद्ध भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन अयंगार यांच्या जयंतीचे औचित्य साधून सोमवार दि.22 डिसेंबर 2025 रोजी गणितोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



उत्सवाचे उद्घाटक म्हणून विद्यालयाचे उपमुख्याध्यापक दत्तात्रय जीवने तथा विशेष अतिथी म्हणून प्रणिता मंदाडे हे होते.प्रमुख पाहूने म्हणून परशराम वसावे,शंकर डूडूळे, अतिश पत्रे, सौ.विद्या ठाकरे व पालक प्रतिनिधी सौ.रोशनी रवींद्र इंगोले, लक्ष्मण बाबुलाल जाधव,विनोद जाधव यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते श्रीनिवास रामानुजन अयंगार आणि श्री. शिवाजी शिक्षण संस्था, पुसदचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत लोकनेते स्व.देवराव पाटील (चोंढीकर) यांच्या प्रतिमेचे पूजन तथा दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले.

या उपक्रमात इयत्ता 5 वी ते 8 वी च्या 150 हून अधिक विद्यार्थी/विद्यार्थिनींनी गणितीय भित्तिपत्रके, स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य,गणितीय खेळ,रांगोळी यांच्या माध्यमातून गणितातील संकल्पना सर्जनशील, आकर्षक व आनंददायी पद्धतीने सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारंग कोरटकर यांनी केले. रामानुजन यांची वेशभूषा साकारणारा आदर्श जाधव वर्ग 8(ब ) आर्यभटाची वेशभूषा साकारणारा आरुष जाधव वर्ग 8( ब)मधील आदर्श जाधव, गणितोत्सवाच्या यशस्वीतेसाठी कु.अर्चना भगत, प्रवीण ढवळे, भारत राठोड,नितीन गायकवाड,मंगेश जाधव,महेंद्र अंबुरे यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक/शिक्षिका तथा शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

